## निशाणी क्र.१३ वरील आदेश

प्रतिवादी क्र.१ व २ यांनी प्रस्तुत अर्जाद्वारे त्यांच्याविरुध्द झालेला विना कैफियत सुनावणीचा आदेश रद्द होवून पटलावर कैफियत दाखल करण्याची परवानगी मागितली. प्रस्तुत अर्जाच्या पृष्ठयर्थ प्रतिवादी क्र.१ व २ यांनी त्यांचे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे.

०२. प्रतिवादी अर्जात कथन करतात की, त्यांना दाव्याचे समन्स बजावणी झाल्यानंतर ते हजर झालेले आहेत. परंतु, प्रतिवादी यांनी त्यांना आवश्यक ती महत्वाची कागदपत्रे मुदतीत उपलब्ध न झाल्याने त्यांना त्यांची कैफियत दाखल करता आली नाही. त्यामुळे, त्यांनी विना कैफियत आदेश रद्द होवून कैफियत पटलावर घेण्याची विनंती केली.

०३. वादीने प्रस्तुतच्या अर्जावर त्यांचे म्हणणे नोंदवून सक्त हरकत घेतली आहे.

०४. प्रस्तुतचे अर्ज व प्रकरणाचे अवलोकन केले. दोन्ही विधिज्ञांच्या सन्माननीय विधिज्ञांनी केलेला युक्तीवाद ऐकला. प्रस्तुतचा दावा अतिक्रमण दूर करुन मिळणेकामी दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र.१ व २ यांना दि.०९/११/२०२३ रोजी समन्सची बजावणी झालेली आहे. तसेच, प्रतिवादी दि.२१/११/२०२३ रोजी न्यायालयात हजर झालेले आहेत. दिवाणी प्रक्रिया

संहिता आदेश ८, नियम १ प्रमाणे प्रतिवादीला दाव्याचे समन्सची बजावणी झालेपासून ३० दिवसांच्या आत अथवा न्यायालयाच्या परवानगीने जास्तीत जास्त ९० दिवसांत कैफियत सादर करता येते. परंतु, प्रस्तुत प्रकरणाचे अवलोकन केले असता, प्रतिवादी क्र.१ व २ यांना दि.०९/११/२०२३ रोजी समन्सची बजावणी झालेली अभिलेखावरुन दिसून येते. त्यामुळे, प्रस्तुत दाव्यामध्ये प्रतिवादी क्र.१ व २ यांना कैफियत दाखल करणेकामी ५ महिन्यांचा विलंब झालेला आहे.

०५. मुदतीचा कायदा कलम ५ प्रमाणे विलंबासाठी संयुक्तीक कारण नमुद करणे आवश्यक आहे. प्रतिवादी क्र.१ व २ यांनी दाव्याचे कामी कैफियत दाखल करणेसाठी आवश्यक ती महत्वाची कागदपत्रे मुदतीमध्ये उपलब्ध झाले नसल्याने मुदतीत कैफियत दाखल करता आली नाही असे कारण अर्जामध्ये नमुद केलेले आहे. परंतु, अर्जामध्ये आवश्यक त्या कागदपत्रांचा तपशिल अथवा ते कागदपत्रे कधी उपलब्ध झाली हे नमुद केलेले नाही. तसेच, प्रस्तुत अर्जामध्ये कैफियत दाखल करणेस किती दिवसांचा उशीर झाला आहे हे देखील नमुद केलेले नाही. त्यामुळे, अर्जात नमुद केलेले कारण हे संयुक्तीक कारण नाही हे स्पष्ट होते. परंतु, दावा अतिक्रमण दूर करुन मिळणेकामी असल्याने प्रतिवादींना त्यांची कैफियत दाखल करण्याची संधी देणे आवश्यक आहे असे मला वाटते. त्याचप्रमाणे, प्रकरणाचे गुणदोषावर न्यायनिर्णय करण्याकरीता प्रतिवादी क्र.१ व २ यांचेविरुध्द पारित करण्यात आलेला विना कैफियत सुनावणीचा आदेश रद्द करुन त्यांना त्यांची कैफियत दाखल करुन देण्याची परवानगी देणे न्यायोचित आहे. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येते:-

# -:आदेश:-

| | |
|---|---|
| १. | अर्ज (निशाणी क्र.१३) रक्कम रु.५००/–च्या खर्चासह मंजुर करण्यात येते. खर्चाची रक्कम वादीला देण्यात यावी. |
| २. | खर्चाची रक्कम वादीला दिल्यानंतर प्रतिवादी क्र.१ व २ यांचेविरुध्द पारित करण्यात आलेला विना कैफियत आदेश रद्द करुन त्यांना कैफियत दाखल करण्याची परवानगी देण्यात येते. |

**(खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला)**

SHIVRATRI RAJU ASHOK

Digitally signed by SHIVRATRI RAJU ASHOK
Date: 2024.07.09 17:11:25 +0530

पाली (रा.अ.शिवरात्री)

दिनांक–०९.०७.२०२४ दिवाणी न्यायाधीश क.स्तर, पाली